# जगभरात शाहरूखच्या 'पठाण'चा बोलबाला; चार दिवसांत ४०० कोटींच्या क्लबमध्ये सामील!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॉलिवूडचा सुपरस्टार शाहरुख खानच्या 'पठाण'ची क्रेझ जगभरात आहे. रिलीजच्या पहिल्या दिवशी रेकॉर्डब्रेक कमाई करणाऱ्या या सिनेमाने चार दिवसांत अनेक रेकॉर्ड आपल्या नावे केले आहेत. रिलीजच्या चौथ्या दिवशी हा सिनेमा ४०० कोटींच्या क्लबमध्ये सामील झाला आहे.



भारतीय सिनेप्रेक्षकांप्रमाणे परदेशातील शाहरुखच्या चाहत्यांची पाऊलदेखील 'पठाण' सिनेमा पाहण्यासाठी सिनेमागृहाकडे वळत आहेत. रिलीजच्या चौथ्या दिवशी परदेशात या सिनेमाने ४९ कोटींची कमाई केली आहे. त्यामुळे आता या सिनेमा जगभरातील बॉक्स ऑफिसवर ४०० कोटींचा टप्पा पार केला आहे. जगभरात आतापर्यंत या सिनेमाने ४२९ कोटींचा गल्ला जमवला आहे.

'पठाण' या सिनेमाने रिलीजच्या पहिल्या दिवशी ओपनिंग डेला ५५ कोटींची कमाई केली होती. तर दुसऱ्या दिवशी ६८ कोटी, तिसऱ्या दिवशी ३८ कोटी आणि चौथ्या दिवशी ५० कोटींची कमाई केली आहे. भारतात या सिनेमाने रिलीजच्या चौथ्या दिवसापर्यंत २११ कोटींची कमाई केली आहे.

शाहरुख खानचा 'पठाण' हा सिनेमा जगभरात ८००० स्क्रीन्सवर प्रदर्शित झाला आहे. या सिनेमात शाहरुखसह दीपिका पादुकोण आणि जॉन अब्राहमदेखील मुख्य भूमिकेत आहेत. सिद्धार्थ आनंदने या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. या सिनेमाच्या माध्यमातून शाहरुखने चार वर्षांनी रुपेरी पडद्यावर कमबॅक केलं आहे.

शाहरुखचे चाहते गेल्या चार वर्षांपासून त्याच्या सिनेमाची प्रतीक्षा करत होते. आता 'पठाण'च्या माध्यमातून तो चाहत्यांच्या भेटीला आला आहे. चाहते आपल्या लाडक्या सेलिब्रिटीचा सिनेमा पुन्हा पुन्हा सिनेमागृहात जाऊन पाहत आहेत. हजारो रुपये खर्च करुन वादाच्या भोवऱ्यात अडकलेला लाडक्या सेलिब्रिटीचा सिनेमा पाहताना चाहते मात्र आनंदी आहेत. वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या या सिनेमाचे अनेक खास शो आयोजित करण्यात येत आहेत. टाळ्या, शिट्ट्या वाजवत चाहते त्यांच्या लाडक्या सेलिब्रिटीचा सिनेमा पाहत आहेत. बॉलिवूडसाठी मागचं वर्ष खास नव्हतं. पण या वर्षाच्या सुरुवातीलाच शाहरुखच्या 'पठाण'ने बॉलिवूडला सुगीचे दिवस दाखवले आहेत.

# भारतीय मुलींची कमाल! फायनलमध्ये इंग्लंडला मात देत अंडर १९ विश्वचषकावर कोरलं नाव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या अंडर १९ महिला संघाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच पार पडणाऱ्या अंडर-१९ महिला ढ२० विश्वचषकावर भारतीय संघानं नाव कोरलं आहे. दक्षिण आफ्रिकेत झालेल्या १९ वर्षांखालील महिला विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात इंग्लंडला ७ विकेट्सच्या फरकाने मात देत विश्वचषकावर भारतीय संघाचं नाव कोरलं आहे. आधी गोलंदाजी निवडून भारतानं संपूर्ण इंग्लंड संघाला अवघ्या ६८ धावांत गुंडाळलं. ज्यानंतर ६९ धावाचं माफक आव्हान केवळ तीन विकेट्सच्या बदल्यात १४ षटकात पूर्ण करत सामना आणि विश्वचषक जिंकला आहे.



तर भारत विरुद्ध इंग्लंड या फायनलच्या सामन्याचा विचार करता सर्वप्रथम नाणेफेक जिंकत भारतानं प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडला स्वस्तात रोखून निर्धारीत लक्ष्य पार करण्याचा भारताचा डाव होता. कर्णधाराच्या निर्णयाला साजेशी खेळी करत भारतीय महिलांनी सुरुवातीपासून इंग्लंडच्या खेळाडूंना तंबूत धाडणं सुरु ठेवलं. १७.१ षटकांत संपूर्ण इंग्लंडचा संघ ६८ धावांवर सर्वबाद केलं. यावेळी भारताच्या सर्वच महिलांनी उत्तम गोलंदाजी केली. यामध्ये तीतस साधूने सर्वोत्कृष्ट गोलंदाजी करत ४ षटकांत केवळ ६ धावा देत दोन विकेट्सही घेतल्या. अर्चना देवी, पार्शवी चोप्रा यांनीही प्रत्येकी दोन मन्नत कश्यप, शेफाली वर्मा आणि सोनम यादव यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेतली. इंग्लंडकडून रॅना हिने सर्वाधिक १९ धावा केल्या.

१२० चेंडूत ६९ धावाचं माफक लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात आलेल्या भारतीय महिलांनी आल्या आल्या स्फोटक खेळी सुरु केली. एक चौकार आणि एक षटकार ठोकून कॅप्टन शेफाली १५ धावांवर तंबूत परतली. सेमीफायनलमध्ये कमाल कामगिरी करणारी श्वेताही ५ धावा करुन बाद झाली. पण नंतर सौम्या तिवारी आणि गोगंदी त्रिशा यांनी एक चांगली भागिदारी करत भारताचा विजय पक्का केला. त्रिशा २४ धावा करुन बाद झाली. पण तोवर भारत विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचला होता. सौम्याच्या नाबाद २४ धावांच्या जोरावर भारतानं १४ षटकात ६९ धावा करत सामना आणि विश्वचषक जिंकला आहे.

आतापर्यंत विश्वचषक स्पर्धेत भारताच्या कामगिरीचा विचार करता सुरुवातीपासून भारताने चांगली कामगिरी केली आहे. भारताचा संघ ड गटात होता. यादरम्यान टीम इंडियाने दक्षिण आफ्रिका, संयुक्त अरब अमिराती आणि स्कॉटलंडचा पराभव केला. यानंतर सुपर सिक्सच्या पहिल्या सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाकडून पराभवाला सामोरे जावे लागले होते. मात्र दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाने दमदार पुनरागमन करत श्रीलंकेचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. ज्यानंतर स्पर्धेत एकही सामना न गमावलेल्या न्यूझीलंडला भारतानं आठ विकेट्स राखून मात देत सामना जिंकला आणि फायनलमध्ये प्रवेश मिळवला. दुसरीकडे इंग्लंड संघाचा विचार करता त्यांनीही आपल्या नावाला साजेशी खेळी सुरुवातीपासून केली होती. सेमीफायनलमध्ये त्यांच्यासमोर ऑस्ट्रेलियाचं तगडं आव्हान होतं, जे देखील त्यांनी पार करत फायनल गाठली. ज्यानंतर फायनलमध्ये एक सोपा विजय मिळवत विश्वचषकावर नाव कोरलं आहे.

# 'आता तू मोठा माणूस झाला आहेस'

## खासदार उदयनराजे भोसले यांच्याकडून अमित ठाकरे यांचे मनमोकळे कौतुक

**सातारा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी रविवारी जलमंदिर येथे खासदार उदयनराजे भोसले यांची भेट घेतली. या भेटीत दोघांनी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केली तेव्हा उदयनराजे यांनी ठाकरे यांना एक सुगंधी परफ्युम भेट दिला. 'आता तू मोठा माणूस झाला आहेस, तू आम्हा सगळ्यांची काळजी घ्यायला पाहिजे' असा ज्येष्ठत्वाचा सल्ला खासदार उदयनराजे यांनी दिला.



अमित ठाकरे यांनी उदयनराजे यांची अनौपचारिक भेट साताऱ्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा घडवून गेली मात्र ही गाठभेट राजकीय स्वरूपाची नव्हती ही भेट वैयक्तिक स्वरूपाची होती असे अमित ठाकरेंनी स्पष्ट केले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुनर्बांधणी करिता महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे सध्या पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून ते शनिवारी साताऱ्यात दाखल झाले आहेत त्यांच्या दोन दिवसाच्या या दौऱ्यामध्ये रविवारी सकाळी पोवई नाका येथे छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला त्यांनी अभिवादन केले त्यानंतर त्यांनी तात्काळ जलमंदिर येथे येऊन खासदार उदयनराजे भोसले यांची भेट घेतली ही भेट अतिशय अनौपचारिक स्वरूपाची होती.

अमित ठाकरे यांनी उदयनराजे भोसले यांचा भगवी शाल आणि पेढे देऊन सत्कार केला तर खासदार उदयनराजे भोसले यांनी अमित ठाकरे यांना एक खास ब्रँडचा परफ्युम भेट म्हणून दिला तू लहान राहिला नाहीस तर मोठा माणूस झाला आहेस सगळ्यांची काळजी घेतली पाहिजे म्हणून हा परफ्युम दिला आहे यापुढे आपली राजकीय वाटचाल अशीच होत राहो अशा शुभेच्छा ही उदयनराजे यांनी दिल्या.

या भेटीवर प्रतिक्रिया देताना अमित ठाकरे म्हणाले साताऱ्यात आलो तर राजेंना भेटलो नाही असे होऊ शकत नाही ही भेट राजकीय स्वरूपाची नव्हती तर ती खाजगी स्वरूपाची होती . खासदार उदयनराजे भोसले या भेटी संदर्भात बोलताना म्हणाले मला माझा मुलगा घरी आल्यासारखे वाटले आम्हीच सारख्या तरुण नेत्यांनी पुढे आली पाहिजे आणि लोकांची त्यांच्या माध्यमातून सेवा केली पाहिजे ठाकरे करण्याचा इतिहास मोठा आहे प्रबोधनकार ठाकरेंपासून बाळासाहेब ठाकरे राज ठाकरे या सगळ्यांचा नावलौकिक त्यांनी केला पाहिजे अमित ठाकरेंचा फॅन फॉलोइंग सुद्धा जोरात आहे असे ते म्हणाले या भेटीदरम्यान अमित ठाकरे यांनी उदयनराजेंचा भ्रमणध्वनी वरून थेट राज ठाकरे यांच्याशी संपर्क करून दिला दहा मिनिटांच्या या संवादामध्ये उदयनराजे भोसले आणि राज ठाकरे यांनी सुद्धा एकमेकांशी ख्याली खुशाली विचारून वेगवेगळ्या विषयांवर राजकीय संवाद साधला.

# विमान अपघातात बेळगावचे विंग कमांडर हणमंतराव सारथी यांचा मृत्यू

**बेळगाव : वृत्तसंस्था**

वायू दलाची शान समजली जाणाऱ्या दोन लढाऊ विमानांमध्ये टक्कर झाली .नव्या दमाच्या पायलट्सचं ट्रेनिंग सुरु असताना हा अपघात झाला. या अपघातात एका पायलटवर काळाने घाला केला. बेळगावचे विंग कमांडर हणमंतराव सारथी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. इतर दोन पायलट गंभीर जखमी झाले आहेत. हवाई दलाने या अपघाताच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

हणमंतराव सारथी यांच्या कुटुंबाला लष्करी सेवेची पार्श्वभूमी आहे. त्यांचे वडील रेवणसिद्दपा सारथी हे सेनेमध्ये कॅप्टन म्हणून निवृत्त झाले आहेत. तर त्यांचा एक भाऊ रवी हे सुद्धा हवाई दलात वैमानिक म्हणून सेवा बजावत आहेत. हणमंतराव यांचे पोस्टिंग सध्या मध्यप्रदेशमधील ग्वाल्हेर येथे होते. दैनंदिन सरावासाठी त्यांनी ग्वाल्हेर येथून उड्डाण केले होते. त्यानंतर काही वेळातच त्यांच्या विमानाची आणि अन्य एका विमानाची आकाशात धडक होऊन झालेल्या दुर्घटनेत त्यांना वीरमरण आले. त्यांच्या मागे आईवडील, पत्नी, दोन मुले, भाऊ आणि दोन बहिणी असा परिवार आहे. त्यांचा पार्थिव आज हवाई दलाच्या खास विमानाने बेळगावात आणणार आहेत.

सारथी यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# वधू-वर परिचय मेळाव्यात वधूच दाखवली नाही

## शेकडो लग्नाळू तरुणांची मोठी आर्थिक फसवणूक

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापुरात वधू वर परिचय मेळाव्याच्या नावाखाली अनेकांची फसवणूक झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. वधू वर मंडळाने वधूच दाखवली नाही. यामुळे मेळाव्यात गोंधळाचं वातावरण होतं. काहीतरी गडबड असल्याचा संशय लग्नाळू तरुण आणि त्यांच्या कुटुंबीयांना आला. त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार केली. यानंतर बार्शीत रजिस्ट्रेशनच्या नावाखाली शेकडो लग्नाळू तरुणांची फसवणूक केल्याची बाब उघड झाली.




बार्शी शहरात शेकडो लग्नाळू तरुणांना लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. कथित वधू वर मंडळाकडून हजारो रुपयांची फी घेऊन त्यांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. वधू वर परिचय मेळाव्यात वधूच दिसली नाही. यामुळे लग्नाळू तरुण आणि पालकांनी संताप व्यक्त करत बार्शी शहर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी कथित वधू वर मंडळ चालक, महिला आणि एजंटला ताब्यात घेतले आहे.

बार्शी शहरातील एका मंगल कार्यालयात सुशिक्षित तरुणांचा वधू वर पालक परिचय मेळावा आयोजित केला होता. सदर बार्शी शहरात वधू वर मंडळाकडून तिसरा मेळावा घेण्यात आला होता. मात्र, मेळाव्यात लग्नाळू तरुणांना वधूच दाखवण्यात आली नाही. बार्शीतील मेळाव्यात हीच परिस्थिती होती. त्यामुळे भावी नवरदेवांच्या नातेवाईकांना संशय आला. वधूच दाखवली नसल्याने वर मंडळींनी संताप व्यक्त करत मेळावा चालकाला धारेवर धरले होते.

आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यानंतर लग्नाळू तरुण, कुटुंबीय, नातेवाईक बार्शी पोलीस ठाण्यात पोचले. पोलिसांनी या प्रकरणी तपास केला. यात लग्नाळू मुलांच्या आई-वडिलांकडून लग्न जुळवण्यासाठी पैसे घेतल्याची बाबही समोर आली आहे. त्यामुळे कथित वधू-वर मंडळाचे बनावट रॅकेट उघड झाले. पोलिसांनी वधू-वर मंडळ चालक, महिला, एजंटला ताब्यात घेतले आहेत.

**■ तीन ते दहा हजार रुपयांपर्यंत उकळले पैसे**

पालक व तरुण आज या ठिकाणी मुलगी दाखवली जाईल. तसेच मुलगी पसंत पडताच लगेच लग्न लावून दिले जाईल, असे आश्वासन दिले जात होते. यासाठी लग्नाळू तरुण तसेच त्यांच्या नातेवाइकांकडून रजिस्ट्रेशन फी म्हणून प्रत्येकी हजार रुपये व डिपॉझिट म्हणून तीन ते दहा हजार रुपयांपर्यंत रक्कम घेतल्याची बाबदेखील समोर आली आहे.

**■ आजतागायत एकही लग्न लावून दिले नाही**


हे वधू वर सूचक मंडळ नोंदणीकृत नाही. तसेच या मंडळाने आजपर्यंत एकही लग्न लावून दिलेले नाही. केवळ आश्वासने दिली. पोलिसांच्या वधू-वर मंडळ चालक असलेल्या महिलेच्या बोलण्यावरून दिसून आले. पोलिसांनी केलेल्या चौकशीनंतर बोगस वधू-वर सूचक मंडळाचे बिंग फुटले.

# धीरेंद्र महाराजाची बौद्धिक दिवाळखोरी, तुकाराम महाराजांविषयी वादग्रस्त वक्तव्य

**मुंबई : वृत्तसंस्था**

दिव्य दरबारात चमत्कारांचे दावे करणाऱ्या आणि अंनिसने आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर महाराष्ट्रातून पळ काढणाऱ्या धीरेंद्र महाराजाने आपल्या वैचारिक दिवाळखोरीचं जगासमोर प्रदर्शन केलंय. संत तुकाराम महाराजांना त्यांची बायको मारायची म्हणून त्यांनी आयुष्यभर देवाचा धावा केली, त्याचमुळे ते विठ्ठलाच्या भक्तीत दंग झाले, असं वादग्रस्त वक्तव्य धीरेंद्र महाराजाने केलं आहे.

संत तुकाराम महाराज यांना त्यांची पत्नी रोज मारहाण करायची. म्हणूनच त्यांनी देवाचा धावा केला. त्यांना विचारण्यात आलं, बायकोकडून मार खाता, तुम्हाला लाज वाटत नाही का? त्यावेळी महाराज म्हणाले. ही तर देवाची कृपा आहे. ती मला रोज मारते. जर मला प्रेम करणारी बायको मिळाली असती तर मी देवाचा धावाच केला नसता, अशी मुक्ताफळे धीरेंद्र महाराज याने उधळली आहेत.



धीरेंद्र महाराज याच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर सगळीकडून त्याच्यावर टीकेचा भडीमार होऊ लागला आहे. भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी धीरेंद्र महाराजाकडे माफीची मागणी केली आहे तसेच देहू संस्थानाने देखील धीरेंद्र महाराजाच्या बरळण्यावर टीका करत तत्काळ माफीची मागणी केली आहे.

केवळ वारकरी संप्रदायाचा नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा अपमान झाला आहे. त्यामुळे बागेश्वर धामच्या धीरेंद्र बाबाने माफी मागावी, अशी मागणी भाजपच्या आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष तुषार भोसले यांनी केलीये.

तुकोबांना घास भरवल्याशिवाय त्या अन्न, पाणी घेत नव्हत्या. डोंगराच्या ठिकाणी नामस्मरणात असलेल्या तुकोबांना त्या भाकरी खाऊ घालून यायच्या. पतीव्रतेची त्यामागची भूमिका त्यांची होती. त्यामुळे त्यांच्यावर चुकीचे वक्तव्य करू नयेत, असं देहू संस्थानचे विश्वस्त माणिक महाराज मोरे यांनी म्हटलंय.

**■ कोण आहे धीरेंद्र महाराज?**

बागेश्वर महाराजांचं मूळ नाव धीरेंद्र रामकृपाल गर्ग. त्याचा जन्म १९९६ साली झाला. मध्य प्रदेशातील छत्तरपूर जिल्ह्यातल्या गढा गावातला जन्म त्याच्या वडिलांचं नाव रामकृपाल गर्ग आणि आईचं नाव सरोज गर्ग. तीन भावंडांमध्ये धीरेंद्र हा सर्वात मोठा. धीरेंद्र याचं शिक्षण केवळ बारावीपर्यंत झालंय.

# ओडिशाचे आरोग्यमंत्री नबा दास यांचं उपचारादरम्यान निधन

## पोलिस अधिकाऱ्यानं केला होता गोळीबार

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

ओडिशाचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री आणि बिजू जनता दल (बीजेडी) ज्येष्ठनेते नबा दास यांचं उपचारादरम्यान निधन झालं आहे. ते ६० वर्षांचे होते. त्यांच्यावर एका पोलिस अधिकाऱ्याने गोळीबार केला होता. पश्चिम ओडिशातील झारसुगुडा जिल्ह्यात आज ब्रजराजनगरमध्ये दिवसाढवळ्या एका सहाय्यक उपनिरीक्षकाने नबा दास यांच्यावर गोळीबार केल्याने गंभीर जखमी झाले होते. दास यांच्यावर अपोलो हॉस्पिटमलमध्ये उपचार सुरु होते.

६० वर्षीय दास हे एका कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गांधी चौकात आपल्या कारमधून उतरत असताना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गोपाल दासने त्याच्यावर पॉइंट ब्लँक रेंजमधून गोळीबार केला होता. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. दरम्यान, या घटनेनंतर उपविभागीय पोलिस अधिकारी गुप्तेश्वर भोई यांनी सांगितले होते की, नबा दास यांच्या छातीवर डाव्या बाजूला गोळ्या लागल्या. एएसआयच्या रिव्हॉल्व्हरमधून काही गोळ्या लागल्याने शेजारी असलेला एक पोलिस कर्मचारी जखमी झाला आहे.

ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी मंत्री नाबा दास यांच्या दुर्दैवी निधनाबद्दल तीव्र शोक आणि दुःख व्यक्त केले आहे. नवीन पटनायक यांनी म्हटलं आहे की, नबा दास हे सरकार आणि पक्षासाठी खूप महत्वाचे होते. त्यांच्या निधनाने ओडिशा राज्याचे मोठे नुकसान झाले आहे, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.



नब किशोर दास यापूर्वी काँग्रेसमध्ये होते. २००४ मध्ये त्यांनी पहिल्यांदा ओडिशातील झारसागुडा मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. तिथं त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर २००९ मध्ये त्यांनी पुन्हा निवडणूक लढवली आणि जिंकली. त्यानंतर त्यांनी २०१४ आणि २०१९ च्या निवडणुका जिंकत विजयाची हॅट्रिक केली.

सध्या ते बिजू जनता दलमध्ये होते. ते नवीन पटनायक यांच्या सरकारमध्ये आरोग्यमंत्री होते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, नबा किशोर दास हे देशातील सर्वात श्रीमंत मंत्र्यांपैकी एक होते. मुख्यमंत्र्यांनंतर मंत्रिमंडळातील ते दुसरे सर्वात श्रीमंत मंत्री होते.